# प्रेसनोट

नाशिक,
दि. २२/०७/२०२५

**आलोसे राजाराम रुंझा डगळे, वय -४३, पोलीस हवालदार १८४२, नेमणूक घोटी पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामिण यांनी ५०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | घोटी पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामिण, गु.र.नं. २५६/२०२५, |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७ सह भारतीय नागरीक संहिता सन २०२३ चे कलम २३८ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | राजाराम रुंझा डगळे, वय -४३, पोलीस हवालदार १८४२, नेमणूक घोटी पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामिण |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १५०००/- रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५०००/- रूपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारादार यांची मो.सा. तक्रारदारांची मुलगी आजारी पडल्याने तिच्या औषधापचाराकरीता त्यांनी सदरची मो.सा श्री. वाघ यांचेकडे गहाण ठेवून त्यांचेकडून १२,०००/-रु उसने घेतले होते. तक्रारदार यांनी वाघ यांना त्यांचेकडून मो.सायकल गहाण ठेवून घेतलेले १५,०००/-रु व्याजासह परत करुनही त्यांनी तक्रारदार यांना त्यांची मो. सायकल परत केली नाही. म्हणून तकारदार योगेश वाघ यांचेकडे मो.सायकल परत देणेकरीता तगादा लावला असता, त्यांनी तक्रारदार यांचे घरी येवून त्यांना व त्यांच्या पत्नीला मारहाण केली म्हणून तक्रारदार यांचे पत्नीने वाघ यांचेविरुध्द घोटी पोलीस स्टेशन येथे एन.सी नोंद केली होती. तेव्हा तेथील पोलीस स्टेशनचे आलोसे राजाराम रुंझा डगळे, पोलीस हवालदार १८४२, नेमणूक घोटी पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामिण यांनी तक्रारदार यांची मोटार सायकल त्यांना परत मिळवून देवून त्या मोबदल्यात तक्रारदार यांचेकडे १५,०००/-रु लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने सापळा कारवाई दरम्यान राजाराम रुंझा डगळे, पोलीस हवालदार १८४२, नेमणूक घोटी पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामिण यांनी तक्रारदार यांचे कडे १५०००/- रु लाचेची मागणी करून तडजोडीअंती पहिला हप्ता ५,०००/- रु स्विकारुन सापळा पथक त्यांचे दिशेने येताना बघून पुरावा नष्ट करण्याच्या हेतुने पळुन गेल्याने त्यांचेविरूध्द दि.२२.०७.२०२५ रोजी घोटी पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामिण, गु.र.नं. २५६/२०२५, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७ सह भारतीय नागरीक संहिता सन २०२३ चे कलम २३८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.


संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in
ई-मेल :- spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :- acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२५३-२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲपक :- ९९३०९९७७००


स्वा. प. राजपूत
( स्वप्निल राजपुत )
पोलीस निरीक्षक, ( वाचक )
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक

Scanned with CamScanner